

दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे

वर्ष ६ ▮ अंक ५४ ▮ मंगळवार २४ नोव्हेंबर २०२६ ▮ पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322



माजी नगरसेवक बाळासाहेब पवारांसह तिघांच्या घरात चोरी करणारा आरोपी निघाला हिंगोलीचा

तोफखाना पोलिसांकडून अटक । पावणेचार लाखांचा मुद्देमाल जप्त



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– शहरातील पाईपलाईन रोड परिसरात झालेल्या दोन घरफोडीच्या गुन्ह्यांचा छडा लावण्यात तोफखाना पोलिसांना मोठे यश आले आहे. पोलिसांनी हिंगोली येथील एका सराईत आरोपीला अटक करून त्याच्याकडून ३ लाख ८० हजार ५०० रुपये किमतीच्या सुमारे ४ तोळे वजनाच्या सोन्याच्या तीन लगडी हस्तगत केल्या आहेत.

दिनांक १२ नोव्हेंबर रोजी बायजाबाई सोसायटी येथील बाळासाहेब पवार आणि अमोल झेंडे यांच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने सोन्याचे दागिने व रोकड असा एकूण ३ लाख २९ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला होता. तसेच, राजश्री रसाळ यांच्या घरीही घरफोडी झाली होती. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले होते.

पोलिसांनी गोपनीय माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे या गुन्ह्यांचा शोध घेतला असता, हिंगोली येथील अजय महावीर भुक्तर याने हे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले. तो जवाहर नगर पोलीस ठाण्याच्या कोठडीत असल्याची माहिती मिळताच, तोफखाना पोलिसांनी ट्रान्सफर वॉरंटद्वारे त्याचा ताबा घेऊन अटक केली. तपासादरम्यान त्याने दोन्ही गुन्ह्यांची कबुली देत चोरीचे सोने काढून दिले.

■ पान ४ वर

नगर तालुक्यातील अवैध धंदे त्वरित बंद करा

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचा तीव्र आंदोलनाचा इशारा, एसपींना निवेदन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– नगर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेले मटका, पत्त्याचे क्लब, हातभट्टीची दारू आणि ऑनलाइन बिंगो यांसारखे अवैध धंदे तात्काळ बंद करावेत, तसेच या व्यवसायांना पाठीशी घालणाऱ्या हप्तेखोर पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात पक्षाचे नगर तालुकाध्यक्ष शरद खंडेराव पवार यांनी पोलीस अधीक्षकांना लेखी निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यातील अनेक गावे आणि बाजारपेठांमध्ये बेकायदेशीर दारू विक्री व जुगाराचे अड्डे राजरोसपणे सुरू आहेत. या व्यसनाधीनतेमुळे तरुण पिढी आणि विद्यार्थी कर्जबाजारी होऊन अनेक कुटुंबांचे संसार उध्वस्त होत आहेत. काही दिवसांपूर्वीच तालुक्यातील लांडगा पिंपळगाव येथे एका व्यक्तीने हातभट्टी दारूच्या नशेत पत्नीसह मुलांची हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली होती. सद्यस्थितीत दुष्काळाच्या छायेत असलेल्या शेतकऱ्यांचे आणि नागरिकांचे प्रपंच या अवैध धंद्यांमुळे अधिकच संकटात सापडले आहेत.

विद्यमान पोलीस अधीक्षकांनी पदभार स्वीकारल्यानंतर अवैध व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते; मात्र, काही महिन्यांतच हे धंदे पुन्हा जोमाने सुरू झाले आहेत. याला नगर तालुका

■ पान ४ वर

दुष्काळावर मात करीत समृद्ध गावांच्या निर्मितीसाठी अहिल्यानगरमध्ये सरपंचांचा महासंवाद!

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत २७ नोव्हेंबरला नाशिक विभागीय कार्यशाळा व पुरस्कार वितरण सोहळा । विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह मंत्री, ग्रामविकास श्री जयकुमार गोरे ,व ईतर लोकप्रतिनिधींची उपस्थिती

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास, ग्रामपंचायतींचे सक्षमीकरण आणि गावांना विकासाच्या शाश्वत मार्गावर नेण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायतराज विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५-२६' अंतर्गत नाशिक विभागाची विभागस्तरीय कार्यशाळा, पुरस्कार वितरण सोहळा तसेच 'दुष्काळावर मात आणि समृद्ध गावांचा संकल्प' या विषयावरील सरपंच परिसंवादाचे आयोजन शुक्रवार, दि. २७ नोव्हेंबर २०२६ रोजी अहिल्यानगर येथे करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम सकाळी १० वाजता द्वारका लॉन, नेप्ती चौक, बायपासजवळ, नगर-कल्याण रोड, अहिल्यानगर येथे होणार आहे. या कार्यक्रमाला विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री डॉ. योगेश कदम यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच नाशिक विभागातील सर्व खासदार, आमदार, ग्रामविकास विभागाचे सचिव, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, सरपंच आणि ग्रामपंचायत अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायतींचा होणार गौरव

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या माध्यमातून गावपातळीवर विकासाची विविध कामे प्रभावीपणे राबविणाऱ्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहन देण्यात येत आहे. या अभियानांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या नाशिक विभागातील पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायतींचा या सोहळ्यात सन्मान करण्यात येणार आहे. या पुरस्कारांमुळे ग्रामपंचायतींच्या विकासकामांना प्रोत्साहन मिळण्याबरोबरच इतर ग्रामपंचायतींनाही उत्कृष्ट कामगिरी करण्याची प्रेरणा मिळणार आहे.

दुष्काळमुक्त आणि समृद्ध गावांच्या निर्मितीवर विचारमंथन

अहिल्यानगरसह नाशिक विभागातील अनेक भागांना दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना, जलसंधारण, पाण्याचे नियोजन, लोकसहभागातून जलव्यवस्थापन, नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन आणि गावांच्या आर्थिक समृद्धीसाठी आवश्यक उपाययोजना या विषयांवर सरपंच परिसंवादात विचारमंथन होणार आहे. गावाच्या विकासात सरपंच आणि ग्रामपंचायतींची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, स्थानिक गरजा ओळखून विकासाचे नियोजन करणे, उपलब्ध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि ग्रामस्थांच्या सहभागातून विकासकामे पूर्ण करणे याबाबत या परिसंवादातून मार्गदर्शन मिळणार आहे. दुष्काळी परिस्थितीवर मात करून प्रत्येक गाव स्वयंपूर्ण, जलसमृद्ध आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी लोकप्रतिनिधी व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांमध्ये सकारात्मक विचारांची देवाणघेवाण होणार आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण विकासाला गती देणे, गावांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे आणि विकासाच्या विविध निकषांवर ग्रामपंचायतींची कामगिरी उंचावणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

या विभागस्तरीय कार्यशाळा, पुरस्कार वितरण सोहळा आणि

■ पान ४ वर

बेलापूर येथील जुगार अड्ड्यावर एलसीबीचा छापा; १० जणांवर गुन्हा

कारवाईत ६ लाख ३० हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर येथे सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर मोठी कारवाई केली आहे. या छाप्यात पोलिसांनी १० आरोपींना रंगेहाथ ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून ६ लाख ३० हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

■ पान ४ वर



जनतेच्या मनातील
खासदार...

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष

मा. डॉ. सुजयदादा विखे पाटील

(मा. खासदार व प्रदेश उपाध्यक्ष, भाजप)

यांना वाढदिवसानिमित्त

हार्दिक शुभेच्छा!



दादा... आपणास उदंड आयुष्य लाभो, उत्तम आरोग्य लाभो...



शुभेच्छुक

मा. श्री. निखिल वारे

सन्माननीय नगरसेवक, अहिल्यानगर महापालिका, अहिल्यानगर
जिल्हा महामंत्री, भाजप, अहिल्यानगर

जम्मू-काश्मीरमधील वैष्णोदेवीच्या सान्निध्यात बुरूडगावच्या नवरदेवाचा विवाह सोहळा!

७०० वऱ्हाडी मंडळींना वैष्णोदेवी मातेचे दर्शन; पारंपरिक सनई, ढोल-ताशांच्या गजरात विवाह संपन्न । धार्मिक वातावरणात विवाह सोहळा साजरा करत डीजेमुक्तीचा संदेश; महाराष्ट्राच्या संस्कृतीचा जम्मू-काश्मीरमध्ये जागर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– अहिल्यानगर तालुक्यातील बुरूडगाव येथील प्रगतशील शेतकरी तथा जय मातादी उद्योग समूहाचे संस्थापक नवनाथ वाघ यांचे सुपुत्र सिद्धांत वाघ आणि श्रीरामपूर येथील ऐश्वर्या तुपे यांचा विवाह सोहळा जम्मू-काश्मीर येथील वैष्णोदेवी मातेच्या पवित्र धार्मिक परिसरात निसर्गरम्य वातावरणात मोठ्या उत्साहात पार पडला. या आगळ्यावेगळ्या विवाह सोहळ्यानिमित्त अहिल्यानगर येथून सुमारे ७०० वऱ्हाडी मंडळी जम्मू-काश्मीरमध्ये दाखल झाली. या सर्वांना वैष्णोदेवी मातेचे दर्शन घडविण्यात आले. धार्मिक वातावरणात पार पडलेल्या या विवाह सोहळ्याने वऱ्हाडी मंडळींना एक अनोखा आनंददायी अनुभव दिला.

महाराष्ट्राच्या पारंपरिक संस्कृतीचा ठसा जम्मू-काश्मीरमधील वैष्णोदेवीच्या पवित्र भूमीत उमटला. पारंपरिक सनई, ढोल-ताशांच्या गजरात आणि मंगलाष्टकांच्या मंगलमय सुरांत विवाह सोहळा पार पडला. महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या या सोहळ्याचा जम्मू-काश्मीरमधील पाहुण्यांनीही आनंद घेतला. स्थानिक नागरिकांनी एकत्र येत मराठमोळ्या विवाह परंपरेचा अनुभव घेतला.

नवनाथ वाघ यांनी आतापर्यंत तब्बल ९१ वेळा वैष्णोदेवी मातेचे दर्शन घेतले आहे. आपल्या मुलाचा विवाह वैष्णोदेवी मातेच्या पवित्र परिसरात व्हावा आणि या निमित्ताने आपल्या कुटुंबीयांसह वऱ्हाडी मंडळींनाही मातेचे दर्शन घडावे, अशी त्यांची मनापासून इच्छा होती. या विवाह सोहळ्याच्या माध्यमातून त्यांचे हे स्वप्न पूर्ण झाले. सुमारे ७०० वऱ्हाडी मंडळींना एकत्रितपणे वैष्णोदेवी मातेचे दर्शन घडविण्याचा योग आल्याने सर्वांनी समाधान आणि आनंद व्यक्त केला.


सध्याच्या काळात विवाह सोहळ्यांमध्ये डीजेचा वाढता वापर पाहता नवनाथ वाघ यांनी पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देत विवाह सोहळा साजरा केला. सनई, ढोल-ताशांचा गजर आणि मंगलाष्टकांच्या सुरांत विवाह

■ पान ४ वर

दै. आकर्षण निवडक

स्व.सुरेश मुनोत स्मरणार्थ रविवारी रक्तदान शिबीर

अहिल्यानगर - मर्चंटस बँकेचे माजी चेअरमन स्व.सुरेश मोतीलाल मुनोत यांच्या १६ व्या स्मृतीदिनानिमित्त नगरमध्ये रविवार दि. २९ नोव्हेंबर २०२७ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. जय आनंद महावीर युवक मंडळ व सुरेश मुनोत फौंडेशनतर्फे स्व.सुरेश मुनोत यांच्या स्मरणार्थ गत १५ वर्षांपासून रक्तदान शिबीर घेण्यात येते. यंदाच्या वर्षी रविवारी नवीपेठेतील बाई ईचरजबाई फिरोदिया प्रशालेत सकाळी ९ ते दुपारी ३ यावेळेत शिबीर होणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत यांनी दिली.स्व.सुरेश मुनोत यांनी आपल्या जीवनात कायम समाज सेवेची शिक्षण दिली. साधूसंतांच्या विचारांचा मोठा पगडा असल्याने त्यांनी मानवता धर्माला महत्त्व दिले. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. कारण आजच्या विज्ञान युगात कृत्रिम रक्त निर्मिती करणे अशक्य आहे. अशावेळी एखाद्याने केलेले रक्तदान अत्यवस्थ रूग्णासाठी जीवनदान देणारे असते. याशिवाय रक्त घटकही अनेक रुग्णांना आवश्यक असतात. थॅलेसेमिया सारख्या आजारात रूग्णांना रक्ताची मोठी गरज असते. अशावेळी प्रत्येक निरोगी व्यक्तीने रक्तदान केले पाहिजे. या शिबिराच्या माध्यमातून रक्तदान चळवळ व्यापक करण्यात येत आहे.दरवर्षी या शिबिरात मंडळाचे सदस्य तसेच अनेक दाते उत्स्फुर्तपणे रक्तदान करतात. महिलाही मोठ्या संख्येने रक्तदान करीत असतात. मंडळाचे यंदा रौप्य महोत्सवी वर्षे असल्याने सर्व सदस्यांचा उत्साह वाढला आहे. यावेळी जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करून शिबिराला प्रतिसाद द्यावा, असे आवाहन मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा, कार्याध्यक्ष सत्येन मुथा व मुनोत परिवाराने केले आहे.



संदीप ठोंबे यांच्यासह कार्यकर्त्यांचा वंचित बहुजन आघाडीत जाहीर पक्षप्रवेश!



अहिल्यानगर - वंचित बहुजन आघाडीचे अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या नेतृत्वाखाली आणि राज्य कार्यकारणी सदस्य तथा जिल्हा प्रभारी ज्ञानेश्वर कवठेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत अहिल्यानगर येथील व्ही.आय.पी. सर्किट हाऊस शासकीय विश्रामगृह येथे संदीप ठोंबे व त्यांचे कार्यकर्ते यांचा जाहीर पक्षप्रवेश सोहळा उत्साहात पार पडला. या पक्षप्रवेशामुळे अहिल्यानगर जिल्ह्यात वंचित बहुजन आघाडीची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत होण्यास मदत होणार असल्याची भावना यावेळी पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.या प्रसंगी संदीप जिजाबा ठोंबे, डॉ. भालचंद्र साळवे, योगेश शिंगाडे, सागर देठे, दत्ता सोनटक्के, वैभव सावंत, आशिष खरात, ईश्वर पाटीदार, दिनेश देवळ, ऋषी पवार, प्रकाश शिंदे, विठ्ठल जाधव, गौरव काळे, कार्तिक शिंदे, कुंदन जबरे, सूरज पवार, संदेश केदारे, अनिल विधाते, ऋतुराज अडागळे, अशोक पठारे, अण्णाभाऊ भिंगारदिवे आणि कल्याण सिताराम घोडके यांनी वंचित बहुजन आघाडीमध्ये जाहीर प्रवेश केला. नव्याने पक्षात दाखल झालेल्या सर्व कार्यकर्त्यांचे पक्षाचे निळे पंचे घालून स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्हा प्रभारी ज्ञानेश्वर कवठेकर, दक्षिण जिल्हाध्यक्ष योगेश साठे, नगर तालुकाध्यक्ष रविकिरण जाधव आणि शेवगाव तालुकाध्यक्ष प्यारेलाल शेख यांनी नवप्रवेशित कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. तसेच पक्षाच्या विचारधारेनुसार तळागाळातील वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी संघटितपणे काम करण्याचे आवाहन केले.या पक्षप्रवेशामुळे अहिल्यानगर जिल्ह्यात वंचित बहुजन आघाडीचे संघटन अधिक बळकट होणार असून, नव्या कार्यकर्त्यांच्या सहभागामुळे पक्षाच्या कार्याला नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

विकसित भारत मध्ये आरोग्य उपचार सर्वांना मिळाले पाहिजे - डॉ. दीपक एस एस

भारत– यु के परिसंवाद मध्ये मांडले विचार । एक दिवसात ५ हजार पेक्षा जास्त ई सी जी साठी जागतिक नोंद प्रमाणपत्र प्रदान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– येणाऱ्या २०४७ पर्यंत विकसित भारत मध्ये देशातील प्रत्येक व्यक्तीला वैद्यकीय उपचार मिळतील असे प्रयत्न व्हायला हवे यामुळे एकूण समाज सुदृढ होईल तसेच कुणीही आरोग्य उपचारापासून वंचित राहणार नाही असे प्रतिपादन साईदीप मणिपाल हॉस्पिटल चे चेअरमन डॉ दीपक एस एस यांनी केले. एकाच दिवशी ५८६९ ई सी जी करून विश्व विक्रम केल्याने साईदीप मणिपाल हॉस्पिटल ला जागतिक नोंद म्हणून बुक ऑफ रेकॉर्ड्स चे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

नवी दिल्ली येथे १५ नोव्हेंबर रोजी आयोजित ४थ्या जागतिक परिसंवाद मध्ये डॉ दीपक प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी खासदार रमेश अवस्थी होते या परिसंवाद ला सामाजिक न्याय मंत्री श्री रामदास आठवले, राजस्थान व हिमचाल प्रदेश चे माजी राज्यपाल डॉ कालराज मिश्र,यांनी शुभेच्छा संदेश पाठवले तसेच यु के देशातील जॉन रेनफोर्ड, डॉ डॅनईल ब्राउन, डॉ दिवाकर सुकूल व अन्य मान्यवर उपस्थित होते. डॉ दीपक यांनी १५ वर्षान पूर्वी अनेक रुग्णांना अत्याधुनिक उपचार पद्धती नसल्याने आपले जीव गमवावे लागले परंतु नरेंद्र मोदी



यांनी आरोग्य व्यवस्थेत अमुलाग्रह बदल केल्याने व नवीन उपचार पद्धतही चा अवलंब केल्याने अल्प दरात उच्चतम उपचार मिळण्यास सुरवात झाली देशातील सध्या चिंतेची बाब आहे कॅन्सर आणि या करीता टार्गेटेड रेडियशन थेरपी, गुडघ्याचे व खुब्याचे सांधे रोपण रोबोटीक पद्धतीने केले जात आहेत अवयोव प्रत्यरोपण ज्या मध्ये किडनी, लिव्हर हे अवयोव बदलण्यासाठी विदेशात जावे लागत होते पण आता हे भारतात शक्य व सुरु आहे पुढील काळात २०४७ मध्ये यापेक्षा ही अत्याधुनिक उपचार पद्धती अमलात येणार आहे ज्या मुळे आपल्या देशाची जनता सुदृढ व निरोगी राहण्यास मदत मिळेल आत्मनिर्भर आणि विकसित भारत मध्ये अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे आपल्याच देशात तयार होऊन सेवा देतील आपण पाहतो की कुटुंबात एक व्यक्ती आजारी पडली की संपूर्ण कुटुंब आजारी असल्यासारखी परिस्थिती निर्माण होते आणि ते आज धावपळीच्या जीवनात कुणाला ही परवडत नाही सोबत च लोकांनी योग्य आहार व नियमित व्यायाम केल्याने सुद्धा आजारपण दूर ठेवता येतात यावेळी बोलताना डॉ दिवाकर सुकूल यांनी साईदीप मणिपाल हॉस्पिटल ने जागतिक रेकॉर्ड केले आहे एकाच दिवशी ५८६९ लोकांचे ई सी जी करून नवीन विक्रम स्थापन केला आहे ज्या मध्ये एकूण ६% तपासणी केलेल्या लोकांन मध्ये हृदयाशी संबंधित अनियमितता आढळल्याने त्यांना पुढील तपासणी व त्यांच्या वर आवश्यक मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली तसेच तपासणी दरम्यान एका व्यक्तीस हृदयविकाराचा झटका आल्याने अंजीयो प्लास्टी केली गेली याची दखल घेऊन जागतिक बुक ऑफ रेकॉर्ड्स तर्फे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे हृदय निरोगी तर आयुष निरोगी (दिल फिट तो सब फिट) यावेळी अनेक मान्यवारांनी त्यांचे विचार मांडले या परिसंवाद मध्ये एकूण ६ विषयांवर मान्यवारांनी आपले मत मांडले वैद्यकीय क्षेत्रातून डॉ दीपक एस एस यांनी विचार मांडले.

गोरक्षनाथ गडावर प्रकट दिन उत्साहात साजरा; 'गोरक्षनाथ' नामाच्या जयघोषाने गड दुमदुमला!

आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते महाआरती व गोरक्षनाथ ट्रस्टच्या वेबसाईटचे उद्घाटन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– नगर तालुक्यातील आदर्श गाव मांजरसुंबा येथील श्री गोरक्षनाथ गडावर श्री गोरक्षनाथ महाराज यांचा प्रकट दिन मोठ्या धार्मिक उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने संपूर्ण गड परिसर 'श्री गोरक्षनाथ महाराज की जय'च्या जयघोषाने दुमदुमून गेला. महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. तसेच गोरक्षनाथ देवस्थान ट्रस्टच्या अधिकृत वेबसाईटचे उद्घाटनही त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

प्रकट दिनानिमित्त मंदिर परिसराची आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली होती. पहाटेपासूनच भाविकांनी श्री गोरक्षनाथ महाराजांच्या दर्शनासाठी गडावर गर्दी केली होती. दिवसभर भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. ह.भ.प. शंतनू महाराज लांबे यांची कीर्तनसेवा संपन्न झाली. त्यांनी आपल्या कीर्तनातून श्री गोरक्षनाथ महाराज यांच्या प्रकट दिनाचे महत्त्व विशद करत भक्तांना आध्यात्मिक विचारांची शिकवण दिली. कार्यक्रमानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. तसेच सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते.

यावेळी महापालिका आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, श्री गोरक्षनाथ महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी आहे. प्रकट दिनाच्या पवित्र पर्वावर माझ्या हस्ते महाआरती आणि गोरक्षनाथ देवस्थान ट्रस्टच्या वेबसाईटचे उद्घाटन होणे हा आनंदाचा क्षण आहे. देवस्थानच्या माध्यमातून गोरक्षनाथ गडाच्या विकासासाठी विविध कामे करण्यात आली असून, या कामांमुळे गडाच्या परिसरात सकारात्मक बदल घडून आला आहे. वारकरी संप्रदायाची परंपरा अत्यंत मोठी असून, तिचे मूळ नाथ संप्रदायाशी जोडलेले आहे. देवस्थानच्या माध्यमातून वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. गोशाळेच्या माध्यमातून सुरू असलेले पुण्याचे कार्यही उल्लेखनीय आहे. प्रकट दिनानिमित्त रक्तदान शिबिर आयोजित करून देवस्थानने सामाजिक बांधिलकी जपली आहे, असे त्यांनी सांगितले.

यंदा पर्जन्यमान कमी झाल्यामुळे आगामी काळात पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठ्याची बचत करणे अत्यंत गरजेचे आहे. एप्रिल आणि मे महिन्यांत पाण्याची अधिक गरज भासणार असल्याने आतापासूनच पाण्याचा जपून वापर करावा. पुढील काही महिने कठीण परिस्थितीचे असू शकतात. पुढील वर्षी पाऊस किती पडेल, हे आताच सांगता येत नाही. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने उपलब्ध असलेला पाणीसाठा जपून वापरण्याची जबाबदारी पार

खासगीकरणाच्या धोरणाविरोधात पाटबंधारे कर्मचाऱ्यांची जोरदार निदर्शने

जलसंपदा विभागातील १६ हजार ५०० कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्यांवर टांगती तलवार!

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– राज्य शासनाच्या जलसंपदा (पाटबंधारे) विभागाने जाहीर केलेल्या सुधारित आकृतिबंधामुळे राज्यातील सुमारे १६ हजार ५०० कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्यांवर टांगती तलवार निर्माण झाली आहे. महत्त्वाची शासकीय पदे मृत संवर्ग (डेड कॅडर) म्हणून घोषित करून आऊटसोर्सिंगच्या माध्यमातून बाह्य यंत्रणेकडून कर्मचारी उपलब्ध करून घेण्याचे धोरण राबविले जात असल्याने शासकीय सेवांच्या खासगीकरणाचा मार्ग मोकळा होत असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. या धोरणाच्या निषेधार्थ सोमवारी (दि. २३ नोव्हेंबर) महापालिकेसमोरील पाटबंधारे विभागाच्या कार्यालयात कर्मचाऱ्यांनी जोरदार निदर्शने केली. शासनाने लादलेला बेकायदेशीर सुधारित आकृतिबंध तातडीने रद्द करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या आंदोलनात राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, सचिव रावसाहेब निमसे, भाऊसाहेब शिंदे, वैशाली बोडखे, किशोर गांगर्डे, विजय तोडमल, प्रीती पंडित, पल्लवी सोनवणे, मृदुला भोर, अश्विनी कचरे, सोमनाथ पोटे, सोनाली जगधने यांच्यासह पाटबंधारे विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

जलसंपदा विभागाने दि. १९ नोव्हेंबर २०२६ रोजी आस्थापनेचा सुधारित आकृतिबंध जाहीर केला आहे. यामध्ये खात्यांतर्गत कार्यरत असलेली कनिष्ठ लिपिक, टंकलेखक, संगणक चालक, वाहनचालक, अनुरेखक, सहायक आरेखक, परिचर, भांडारपाल, सहायक भांडारपाल आदी महत्त्वाची पदे मृत संवर्ग म्हणून घोषित करण्यात आली आहेत. ही पदे दैनंदिन प्रशासकीय कामकाजासाठी अत्यंत आवश्यक असतानाही ती कायमस्वरूपी कमी करण्याच्या निर्णयामुळे सध्या या पदांवर कार्यरत असलेल्या जवळपास १६ हजार ५०० कर्मचाऱ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

विभागातील महत्त्वाची पदे मोठ्या प्रमाणात कमी झाल्यास उर्वरीत नियमित कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त भार पडणार आहे. सध्या अनेक कर्मचारी सांभाळत असलेली प्रशासकीय आणि तांत्रिक कामे मर्यादित मनुष्यबळावर पूर्ण करावी लागतील. त्यामुळे शासनाची तसेच सर्वसामान्य जनतेची कामे वेळेत आणि नियमानुसार पूर्ण करणे कठीण होणार आहे. याशिवाय कार्यरत कर्मचाऱ्यांना भविष्यात पदोन्नतीच्या संधी उपलब्ध होण्यावरही मर्यादा येणार आहेत. परिणामी, ज्या पदावर मूळ नियुक्ती झाली आहे, त्याच पदावरून सेवानिवृत्त होण्याची वेळ कर्मचाऱ्यांवर येण्याची शक्यता आहे.

सिंचन व्यवस्थापनाच्या कामकाजातही मोठ्या प्रमाणात पदकपात करण्यात आली आहे. सिंचन शाखेतील कर्मचाऱ्यांची संख्या १४ वरून केवळ चार करण्यात आली आहे. सिंचन व्यवस्थापन, पाणीवाटप आणि पाणीपट्टी वसुली यांसारखी महत्त्वाची कामे अत्यल्प मनुष्यबळावर कशी पार पाडली जाणार, असा प्रश्न कर्मचाऱ्यांनी उपस्थित केला आहे. याचा परिणाम सिंचन व्यवस्थापनावर होण्याबरोबरच पाणीपट्टी वसुलीचे प्रमाण कमी होऊन शासनाच्या महसुलातही मोठी घट होण्याची शक्यता असल्याचे कर्मचारी संघटनेच्या वतीने म्हंटले आहे.

लोकमान्य टिळक मित्र मंडळाच्या 'खंडोबा-बानू विवाह सोहळ्या'ला सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक

आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते मंडळाचा सत्कार; महानगरपालिकेचा मानाचा सन्मान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने आयोजित सार्वजनिक गणेशोत्सव २०२६ देखावा स्पर्धेत शनिश्वर प्रतिष्ठान संचलित लोकमान्य टिळक मित्र मंडळाने सादर केलेल्या 'खंडोबा-बानू विवाह सोहळा' या देखाव्याला धार्मिक व आध्यात्मिक देखावे विभागात प्रथम क्रमांक मिळाला. विशेष म्हणजे, मंडळाने सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक पटकावत आपली यशाची परंपरा कायम राखली. या यशाबद्दल आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते मंडळाचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, सार्वजनिक गणेशोत्सवाची संकल्पना लोकमान्य टिळक यांनी सुरू केली. या उत्सवाच्या माध्यमातून समाज एकत्र यावा, विचारांची देवाणघेवाण व्हावी आणि स्वातंत्र्य चळवळीला बळ मिळावे, हा त्यामागील व्यापक उद्देश होता. आजही जनतेने ही परंपरा जपली आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून लोक एकत्र येऊन सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक विचारांची देवाणघेवाण करतात.

गणेश मंडळे देखाव्यांच्या माध्यमातून आपल्या संस्कृतीचा वारसा जपत असून पुढील पिढीला प्रेरणा आणि ऊर्जा देण्याचे काम करीत आहेत. लोकमान्य टिळक मित्र मंडळ दरवर्षी धार्मिक, आध्यात्मिक आणि ऐतिहासिक देखावे सादर करून समाजाला चांगला संदेश देत असते. यंदाही मंडळाने 'खंडोबा-बानू विवाह सोहळा' हा देखावा अत्यंत सुंदर पद्धतीने सादर केला. त्याची दखल घेत महानगरपालिकेच्या वतीने मंडळाला मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल मंडळाचा सत्कार करताना आनंद होत असल्याचे आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले.

शनिश्वर प्रतिष्ठान संचलित लोकमान्य टिळक मित्र मंडळाने यंदा 'खंडोबा-बानू विवाह सोहळा २०२६' हा देखावा सादर केला. धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणाऱ्या या देखाव्याने अहिल्यानगरसह संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधले. सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक पटकावत मंडळाने गणेशोत्सव देखावा स्पर्धेत आपले वर्चस्व सिद्ध केले. यावेळी माजी महापौर भगवान फुलसौंदर स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले नगरसेवक सुरेश बनसोडे नगरसेवक प्रकाश भागानगरे,मंडळाचे संस्थापक गोरख पडोळे, मार्गदर्शक निलेश गाडळकर, अध्यक्ष अक्षय गाडळकर, उपाध्यक्ष विकी कानडे नीरज माळी.

या देखाव्यासाठी निखिल गाडळकर, केतन गोवेकर, श्रेयश पडोळे, सिद्धांत जाधव, विकास पटवेकर, अमित कानडे, सागर दातरंगे, गौरव पटवेकर, विनायक गाडळकर, विशाल कारखेले, समर्थ पडोळे, धैर्यशील शिंदे, ओम बोरुडे, रितेश कानडे आणि रोनित ताठे यांनी विशेष परिश्रम घेतले.

एसा एपीएल सीझन-४ चा थरार २७ नोव्हेंबरपासून; लिलाव प्रक्रिया उत्साहात पार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– आर्किटेक्ट इंजिनिअर्स अँड सर्व्हेयर्स असोसिएशन, अहिल्यानगर यांच्या वतीने सलग चौथ्या वर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या एसा एपीएल सीझन-४ बॉक्स क्रिकेट स्पर्धेची लिलाव प्रक्रिया मोठ्या उत्साहात पार पडली. एकूण २० संघ आणि १४० सभासदांचा सहभाग असलेली ही संस्थेची वर्षातील सर्वात मोठी क्रीडा स्पर्धा २७ ते २९ नोव्हेंबरदरम्यान साई नगर टर्फ येथे रंगणार आहे.

या स्पर्धेसाठी एस. आर. जे. स्टील हे प्लॅटिनम प्रायोजक आहेत. तर कोनॅटस इंटरप्रायझेस, टोस्टेम विंडोज आणि शनिराज इंटरनॅशनल मॉल हे गोल्ड प्रायोजक आहेत. याशिवाय व्यंकटेश इन्फ्रा, अंबिका स्टोन क्रशर, श्रीराम मार्बल, जी टेक, डायकिन एसी, श्री आनंद सेल्स, वैष्णवी टाईल्स, पंकज स्टील ट्रेडर्स, श्री आनंद ट्रेडिंग कंपनी, अभय सेल्स कॉर्पोरेशन, संकल्प इंटरप्रायझेस, आर्टिको लिफ्ट्स, डायमंड टाईल्स, शुभारंभ टाईल्स अँड ग्रॅनाइट, ढोणे ट्रेडर्स, पटेल सिरॅमिक आणि सम्राट इलेक्ट्रिकल यांनी सिल्व्हर प्रायोजक म्हणून सहभाग नोंदविला आहे.

संस्थेचे अध्यक्ष प्रदीप तांदळे यांनी उपस्थितांचे स्वागत करताना सांगितले की, यंदाचा स्पर्धा सोहळा भव्य स्वरूपात आयोजित करण्यात येणार आहे. स्पर्धेत एकूण ४० साखळी सामने आणि ७ बाद फेरीतील सामने खेळविण्यात येणार आहेत. लिलाव प्रक्रिया आयपीएलच्या धर्तीवर पार पडावी, यासाठी पुण्याहून सनीत मुथा आणि अंकित कोठारी यांची टीम विशेषतः निमंत्रित करण्यात आली होती. २५ आणि २६ नोव्हेंबर रोजी कल्याण रोड येथील पॉवर टर्फवर सराव सामने होणार असून, मुख्य स्पर्धेचे सामने २७ ते २९ नोव्हेंबरदरम्यान साई नगर टर्फ येथे खेळविण्यात येणार आहेत.

संस्थेच्या स्पोर्ट्स कमिटीचे अध्यक्ष जितेश सचदेव म्हणाले की, संस्था मागील चार वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबवित आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून सप्लायर, कंपनी डीलर, उत्पादक, बांधकाम व्यावसायिक, आर्किटेक्ट आणि इंजिनिअर्स यांच्यातील संबंध अधिक दृढ होतात. स्पर्धेमुळे एक कौटुंबिक वातावरण निर्माण होऊन व्यावसायिक संबंध विकसित होण्यासही चालना मिळते.

संस्थेच्या सभासदांमध्ये खेळीमेळीचे वातावरण निर्माण होऊन संस्थेची एकी अधिक बळकट होण्यास या उपक्रमाचा उपयोग होतो. त्याचबरोबर शारीरिक तंदुरुस्ती आणि व्यायामाचे महत्त्व अधोरेखित करून त्यासाठी वेळ देण्याचा संदेश सभासद, ट्रेडर्स, सप्लायर आणि नगरकरांना अशा स्पर्धांच्या माध्यमातून देता येतो, असे त्यांनी सांगितले.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा
फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

दै. आकर्षण निवडक

पॅरा बेंच प्रेस स्पर्धेत अस्मिरोद्दीन सय्यद यांची सुवर्णपंचकाची कामगिरी!



अहिल्यानगर- जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनतीच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीवर मात करत नेक्स्ट लेव्हल फिटनेसचे खेळाडू अस्मिरोद्दीन सय्यद यांनी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. पुणे येथील हिंजवडीमधील महात्मा फुले अपंग शिक्षण केंद्र येथे नुकत्याच पार पडलेल्या पाचव्या राज्यस्तरीय पॅरा ऑलिम्पिक बेंच प्रेस स्पर्धेत त्यांनी ८८ किलो वजनी गटात तब्बल १४१ किलो वजन उचलत सुवर्णपदक पटकावले. विशेष म्हणजे, सलग पाचव्या राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्याचा मान त्यांनी मिळविला असून, त्यांच्या या सुवर्णपंचकाच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. या स्पर्धेतील दमदार कामगिरीच्या जोरावर अस्मिरोद्दीन सय्यद यांची मार्च महिन्यात होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. राज्यस्तरावर सातत्याने आपले वर्चस्व सिद्ध करणाऱ्या अस्मिरोद्दीन यांनी पाच वेळा सुवर्णपदक पटकावत आपल्या मेहनतीची आणि खेळाप्रती असलेल्या समर्पणाची प्रचिती दिली आहे. त्यांच्या या यशामागे नियमित सराव, शिस्तबद्ध व्यायाम, योग्य मार्गदर्शन आणि जिद्दीची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. त्यांना प्रशिक्षक विजय कनोजिया तसेच संघटनेचे चेअरमन विलास दवणे सर यांचे मार्गदर्शन लाभले. अस्मिरोद्दीन यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल नेक्स्ट लेव्हल फिटनेसचे संचालक ओंकार गुर्रम, फिटनेसचे सदस्य रुपेश गायकवाड, यश मोरे, अभि पठाडे, सुमीत जाधव आणि संघर्ष घागरे यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच आगामी राष्ट्रीय स्पर्धेतही त्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून जिल्ह्याचा नावलौकिक वाढवावा, अशा शुभेच्छा दिल्या. राज्यस्तरावर सलग पाच वेळा सुवर्णपदक मिळविण्याची कामगिरी करणाऱ्या अस्मिरोद्दीन सय्यद यांच्यावर क्रीडाप्रेमी, मित्रपरिवार आणि विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

ओम सुप्रभात ग्रुपच्या सदस्यांची मनगाव प्रकल्पाला मदत



अहिल्यानगर - नगर मनमाड रोडवरील देहरे - शिंगवे येथील मनगाव प्रकल्पाला बालिकाश्रम रोडवरील ओम सुप्रभात ग्रुपच्या सदस्यांनी किराणा साहित्य भेट दिले. यावेळी प्रकल्पाचे प्रमुख डॉ. राजेंद्र व डॉ. सुचेता धामणे उपस्थित होते. बालिकाश्रम रोडवर दररोज मॉर्निंग वॉक करण्यासाठी येणाऱ्या ओम सुप्रभात ग्रुपच्या सदस्यांनी एकत्र येऊन वर्गणी केली आणि यातून या प्रकल्पाला किराणा साहित्य दिले. यावेळी ग्रुपचे अध्यक्ष अँड. अशोक गायकवाड, अँड. बबनराव सुंबे, मधुकर साबळे, गोविंद खेर्डेकर, अशोक भूतकर, रमेश बोरुडे, सुदाम देशमुख, नवनाथ कुन्हे हे सहकुटुंब उपस्थित होते. मनगाव प्रकल्पात पाचशे मनोरुग्ण महिलांचा सांभाळ केला जात आहे. प्रकल्पातील स्वच्छता, व्यवस्था आणि सोयी, सुविधा उत्तम आहेत. मात्र मनोरुग्णांना दररोज औषधे आणि भोजनाचा दैनंदिन खर्च मोठा आहे. त्यासाठी दानशूर व्यक्तींनी पुढे येऊन मदत करावी असे आवाहन ग्रुपचे अध्यक्ष अशोक गायकवाड यांनी केले. प्रकल्पामध्ये सुरू करण्यात आलेले गाय गोठाचे काम कौतुकास्पद असल्याचे गायकवाड म्हणाले. यावेळी सदस्यांनी प्रकल्पातील सर्व उपक्रमांची पाहणी केली.

नैसर्गिक प्रसूतीबाबत जनजागृतीसाठी अहिल्यानगरमध्ये रॅली; ३४० नर्सिंग विद्यार्थी व प्राध्यापकांचा सहभाग

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– मातृत्व हा स्त्रीच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील टप्पा असतो. या काळात आईचे आरोग्य, बाळाची सुरक्षितता आणि सन्मानपूर्वक मातृत्व काळजी यांना सर्वोच्च प्राधान्य मिळणे आवश्यक आहे. मात्र, अलीकडच्या काळात सिझेरियन प्रसूतींचे वाढते प्रमाण हा आरोग्य क्षेत्रातील चिंतेचा विषय बनला आहे. या पार्श्वभूमीवर नैसर्गिक प्रसूतीबाबत जनजागृती करण्यासाठी आणि सुरक्षित मातृत्वाचा संदेश समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने अहिल्यानगरमध्ये भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत ३४० नर्सिंग विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. 'सोसायटी ऑफ मिडवाईफ इंडिया' () यांच्या वतीने नैसर्गिक प्रसूती पद्धतीचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी देशभरात राष्ट्रव्यापी वॉकथॉन आणि जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेला पाठिंबा देण्यासाठी रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६ रोजी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे कॉलेज ऑफ नर्सिंग आणि रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले.

रॅलीला सकाळी ९.१५ वाजता डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रापासून सुरुवात झाली. शहरातील प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करत रॅलीचा समारोप प्रोफेसर चौक येथे करण्यात आला.

सिझेरियन प्रसूती ही काही प्रसंगी आई आणि बाळाचे प्राण वाचविणारी अत्यावश्यक वैद्यकीय प्रक्रिया असते. मात्र, वैद्यकीयदृष्ट्या आवश्यकता नसताना केवळ पर्याय म्हणून सिझेरियन प्रसूतीचा अवलंब होऊ नये, हा या जनजागृती मोहिमेचा प्रमुख संदेश होता. प्रत्येक गर्भवती महिलेला तिच्या आरोग्यस्थितीनुसार योग्य वैद्यकीय सल्ला, नैसर्गिक प्रसूतीसाठी आवश्यक मार्गदर्शन, भावनिक आधार आणि सन्मानपूर्वक मातृत्व काळजी मिळाली पाहिजे. नैसर्गिक प्रसूतीला प्रोत्साहन देतानाच माता आणि बाळाची सुरक्षितता सर्वोच्च ठेवणे, प्रसूतीविषयक निर्णयांमध्ये महिलेच्या मताचा आणि सन्मानाचा आदर करणे तसेच आवश्यकतेनुसार योग्य वैद्यकीय हस्तक्षेप स्वीकारणे, ही या मोहिमेची प्रमुख भूमिका होती.

या रॅलीमध्ये नर्सिंग महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि प्राध्यापक असे एकूण ३४० जण सहभागी झाले होते. हातात जनजागृतीपर फलक घेऊन आणि घोषणा देत विद्यार्थ्यांनी नागरिकांमध्ये नैसर्गिक प्रसूतीचे महत्त्व पटवून दिले. आरोग्य क्षेत्रातील व्यक्तींसह समाजातील सर्व घटकांनी या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

याप्रसंगी स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र संघटनेच्या अहिल्यानगर शाखेच्या सचिव डॉ. नीलम बागल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, ''सुदृढ मातृत्व आणि नैसर्गिक प्रसूतीची तयारी ही केवळ गर्भधारणेनंतर सुरू होणारी प्रक्रिया नसून मुलींच्या किशोरवयापासूनच त्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. यासाठी मुली आणि महिलांनी दैनंदिन आहारात कॅल्शियम व लोहयुक्त पदार्थांचा पुरेसा समावेश करणे गरजेचे आहे.'' या सामाजिक उपक्रमासाठी संस्थेचे वैद्यकीय संचालक प्रा. डॉ. अभिजित दिवटे यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलचे अध्यक्ष श्री. अमर गुरव यांनी विशेष उपस्थिती दर्शवून उपक्रमाला पाठिंबा दिला. संपूर्ण कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रतिभा ए. चांदेकर आणि उपप्राचार्या डॉ. योगिता औताडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्रीमती नीलिमा जगताप, श्रीमती रेबेका साळवे आणि कु. नम्रता शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. सकाळी १०.१५ वाजता रॅलीचा उत्साहात समारोप झाला.

अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड घालूनच उत्तम जीवन जगता येते – जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज

देहदानाची चळवळ गतिमान नाणीज पीठअंतर्गत देहदान व अवयवदान करणाऱ्या दात्यांच्या कुटुंबीयांचा मान्यवरांच्या उपस्थितीत गौरव



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अंधश्रद्धेला बळी पडून जीवन उद्ध्वस्त करून घेण्यापेक्षा मन आध्यात्मिक, डोळे विज्ञानवादी आणि बुद्धी वास्तववादी ठेवणे आवश्यक आहे. अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड घालूनच माणसाला उत्तम जीवन जगता येते असे प्रतिपादन जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज (दक्षिण पीठ,नाणीज धाम) यांनी केले.

नाशिक उपपीठांतर्गत अहिल्यानगर, जळगाव, धुळे, नंदुरबार आणि नाशिक या पाच जिल्ह्यांतील भक्तांसाठी अहिल्यानगर येथे आयोजित दोन दिवसीय समस्या मार्गदर्शन व देहदान करणाऱ्या नातेवाईकांच्या सन्मान सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमास आ.सत्यजित तांबे,आ.संग्राम जगताप,अहिल्यानगरच्या महापौर ज्योती गाडे, संगमनेरचे आ.अमोल खताळ, उद्योजक संजय गारुडकर, धनश्री विखे पा., महानगरपालिकेचे उपआयुक्त येलगट्टे, माजी महापौर भगवान फुलसौंदर, नगरसेवक प्रकाश भागानगरे, विजय पठारे आदी मान्यवरांसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी नरेंद्राचार्य महाराज यांनी सामाजिक, पर्यावरणीय आणि शैक्षणिक विषयांवर रोखठोक भूमिका मांडत संप्रदायाच्या माध्यमातून सुरू असलेल्या सामाजिक उपक्रमांची माहिती देताना सांगितले की, आतापर्यंत राज्यभरातून २६८ जणांचे देहदान शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना केले आहे. अहिल्यानगर येथे या पाच जिल्ह्यांतील २६ देहदात्यांच्या नातेवाईकांचा आज विशेष सन्मान करण्यात आला. तसेच ६ ते २० डिसेंबर दरम्यान राज्यभर भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून यातून किमान दोन लाख रक्तपिशव्या संकलित करण्याचा संकल्प असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दुष्काळग्रस्त परिस्थिती पाहता नोव्हेंबर महिन्यात जलसंधारणासाठी अडीच ते तीन हजार वनराई बंधारे बांधण्याचे कामही युद्धपातळीवर सुरू असून पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी संप्रदायाने यंदा ६ लाख १८ हजार नवीन रोपांची लागवड केली आहे.

समाजातील वाढती अराजकता आणि अंधश्रद्धा रोखण्यासाठी शाळा व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात वेद-विज्ञान आणि अध्यात्माचा समावेश करण्याची गरज आहे धर्मांतराचे प्रकार रोखण्यासाठी आणि समाजाला स्वावलंबी बनवण्यासाठी योग्य संस्कार व वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे गरजेचे आहे. आतापर्यंत १ लाख ५७ हजार कुटुंबांची घरवापसी करण्यात यश आले आहे. असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, स्वामीजींच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यानगरमध्ये आयोजित कार्यक्रमाच्या निमित्ताने स्वामीजी पुढील दोन दिवस उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. केवळ अध्यात्म आणि धर्मापुरते मर्यादित न राहता समाजव्यवस्था कशी चालली पाहिजे यावरही या कार्यक्रमात विशेष भर देण्यात आला आहे. समाजातील गरजू व आवश्यक कामांमध्ये घरवापसीचे कार्य अत्यंत महत्त्वाचे असून या माध्यमातून लाखो लोकांची घरवापसी करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि नेताजी पालकर यांनी दाखवलेल्या वाटेवर चालत हे कार्य पुढे नेले जात आहे देहदानाचा संकल्प करून अनेक नागरिकांनी यामध्ये सहभाग नोंदवला आहे. देहदानातून भविष्यात वैद्यकीय शिक्षण आणि अनेक लोकांचे प्राण वाचवण्यास मदत होते असल्याचे ते म्हणाले.

नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आ. सत्यजित तांबे म्हणाले, जगद्गुरु रामानंदाचार्य यांच्या उपस्थितीत आज अहिल्यानगर सारख्या पावन भूमीत मार्गदर्शनाचा एक महत्त्वपूर्ण सोहळा संपन्न होत आहे हे आपले भाग्य आहे.

वंचित मुलांच्या चेहऱ्यावर फुलले आनंदाचे दीप! स्नेहालयात लायन्स क्लबचा १९ वा दीपोत्सव उत्साहात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– वंचित घटकातील मुलांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण फुलवून त्यांची दिवाळी गोड करण्याच्या उद्देशाने लायन्स क्लब ऑफ अहिल्यानगर व लिओ क्लबच्या वतीने सलग १९ व्या वर्षी एमआयडीसी येथील स्नेहालयात दीपोत्सवाचे आयोजन केले होते. रांगोळ्यांनी सजलेले अंगण, लखलखत्या पणत्यांचा प्रकाश, फटाक्यांची आतषबाजी आणि संगीताच्या तालावर धरलेला ठेका अशा उत्साहपूर्ण वातावरणात वंचित घटकातील मुला-मुलींनी दिवाळीचा आनंद मनमुराद लुटला. या दीपोत्सवात स्नेहालयासह शहरातील आरएचईबी, बालभवन, बाबावाडी, बालगृह प्रकल्प, आनंद प्रेम संस्था, मानस ग्राम प्रकल्प, हिम्मत ग्राम प्रकल्प, बालगृह टाकळी आणि शासकीय बालगृहातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

वंचित घटकातील मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलावे, त्यांनाही सणाचा आनंद घेता यावा आणि समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन दिवाळी साजरी करावी, या सामाजिक भावनेतून लायन्स क्लबच्या वतीने दरवर्षी या दीपोत्सवाचे आयोजन केले जाते. यावर्षी दुष्काळाचे सावट असल्याने हा कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, मुलांनी दीपोत्सव साजरा करण्याचा आग्रह धरल्याने त्यांच्या आनंदासाठी यंदाही हा उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला.

डॉ. एस.एस. दीपक आणि उद्योजक बाबूशेठ बोरा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी लायन्स क्लबचे अध्यक्ष हरजितसिंह वधवा, सचिव हरीश हरवानी, खजिनदार विजय कुलकर्णी, लिओ अध्यक्ष हर्षवर्धन किथानी, लिओ सचिव रीत जाजू, ॲड. अनुराधा येवले, अशलता मुंडा, परमिका शेट्टी, संजीवनी गायकवाड, प्रशांत गायकवाड, प्रकल्प प्रमुख दिलीप कुलकर्णी, डॉ. अमित बडवे, प्रिया मुनोत, गुरनूरसिंग वाधवा, दिशा दोडेजा, स्नेहालयाचे डॉ. प्रा. गिरीश कुलकर्णी, हनीफ शेख, सपना असावा, लायन्सचे धनंजय भंडारे, प्रशांत मुनोत, डॉ. सिमरनकौर वाधवा, सुमित लोढा, संदेश कटारिया, अंजली कुलकर्णी, जपज्योतसिंग बग्गा आदींसह लायन्स सदस्य, लिओ सदस्य, गुरू अर्जुन सामाजिक प्रतिष्ठानचे सदस्य आणि स्नेहालय परिवारातील सदस्य उपस्थित होते.

प्रास्ताविकात लायन्स क्लबचे अध्यक्ष हरजीतसिंह वाधवा म्हणाले की, वंचित घटकातील मुलांसमवेत दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी दरवर्षी दीपोत्सवाचे आयोजन केले जाते. यंदा या दीपोत्सवाचे १९ वे वर्ष आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर यावर्षीचा कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, केवळ मुलांच्या आग्रहास्तव हा दीपोत्सव आयोजित करण्यात आला. कोरोना काळातही मुलांचा दीपोत्सव साजरा करण्यात आला होता. या उपक्रमासाठी अनेकांचे सहकार्य लाभत आहे. लायन्स क्लबमधील प्रत्येक सदस्य सेवाभावाने स्वतःला झोकून देऊन समाज घडविण्याचे कार्य करीत असल्याचे त्यांनी सांगितले.डॉ. एस.एस. दीपक यांनी मुलांशी संवाद साधताना जीवनात पुढे जाण्यासाठी सत्याच्या मार्गावर चालण्याचा सल्ला दिला. नेहमी खरे बोलावे, नियमित व्यायाम करावा आणि व्यसनांपासून दूर राहावे, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

उद्योजक बाबूशेठ बोरा म्हणाले की, आई-वडिलांचा तसेच गुरुजनांचा नेहमी सन्मान व आदर करावा. संस्कारांसोबत शिक्षण आत्मसात केल्यास प्रत्येकाला प्रगतीचा मार्ग सापडू शकतो. संस्कारातूनच देश घडणार आहे. त्यामुळे मोठे झाल्यानंतर प्रत्येकाने देश आणि समाजासाठी आपले योगदान देण्याचे सांगितले.मोहनशेठ मानधना यांनी फोनवर मुलांशी संवाद साधून शुभेच्छा दिल्या. ॲड. अनुराधा येवले यांनी लायन्स क्लबच्या सदस्यांचे कौतुक करताना सांगितले

खेळातून शिस्त, बौद्धिक क्षमता व शारीरिक क्षमता विकसित होते - पोलिस अधीक्षक सुदर्शन मुम्मका

अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीगचे प्रारंभ । कडाक्याच्या थंडीतही मैदानावर खेळाडूंचा थरार रंगला; आठ संघांचे विजेतेपदासाठी संघर्ष

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– शहरातील फुटबॉल खेळाडूंच्या क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन देणाऱ्या अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीग (ए.एफ.एस.एल.) २०२६ च्या पाचव्या पर्वाचा प्रारंभ नगर क्लबच्या मैदानावर मोठ्या उत्साहात झाला. शहरात कडाक्याची थंडी असतानाही मैदानावर उतरलेल्या आठही संघांतील खेळाडूंच्या दमदार खेळाने आणि चुरशीच्या सामन्यांनी वातावरण चांगलेच तापले आहे. सकाळपासून सुरू झालेले सामने रात्री उशिरापर्यंत रंगत असून, फुटबॉलप्रेमींना दिवस-रात्र सामन्यांचा थरार अनुभवायला मिळत आहे. नमोह फुटबॉल क्लबच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी क्रीडा पत्रकार जोसेफ विल्यम्स, नमोह फुटबॉल क्लबच्या ओनर नमिता फिरोदिया, महावीर ग्रुपचे राजेश भंडारी, डॉ. अमोल जाधव यांच्यासह विविध संघांचे मालक व त्यांचे प्रतिनिधी, खेळाडू, प्रशिक्षक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटन सोहळ्यात खेळाडूंनी आपापल्या संघांचे ध्वज घेऊन संचलन केले. यावेळी खेळाडूंनी सादर केलेल्या नृत्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. उत्साहपूर्ण वातावरणात आणि दिमाखदार सोहळ्यात पाचव्या पर्वाचा शुभारंभ झाला.

प्रास्ताविकात नमिता फिरोदिया म्हणाल्या की, ग्रास रूटवर जाऊन फुटबॉलचे खेळाडू घडविण्याचे कार्य नमोह फुटबॉल क्लब करत आहे. ८०० मुलांना फुटबॉल खेळाचे प्रशिक्षण दिले जात आहे. क्लबच्या माध्यमातून विविध ७५ टूर्नामेंट घेण्यात आले आहे. शहरात फुटबॉलचे टॅलेंट वाढवण्याचे व खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम या स्पर्धेतून केले जात आहे. सर्वांना सोबत घेऊन शहरात फुटबॉलचा इतिहास घडविण्यासाठी योगदान दिले जात असल्याचे त्या म्हणाल्या.

जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका म्हणाले की, मैदानी स्पर्धेतून खेळाडूंमध्ये शिस्त निर्माण होते. आपल्या देशात मोठ्या प्रमाणात गुणवत्ता आहे, मात्र त्याला प्रोत्साहन व व्यासपीठ देण्याची गरज आहे. अशा स्पर्धेतून खेळाडूंना प्रोत्साहन मिळत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. खेळातून शिस्त, बौद्धिक क्षमता व शारीरिक क्षमता विकसित होते. युवकांमध्ये आत्मविश्वास वाढतो. खेळावर प्रेम करा, खेळातून भरपूर तुम्हाला मिळेल. सध्या शहरी भागात मोबाईलमुळे मैदानावर खेळणे कमी झाले असले तरी अहिल्यानगरमध्ये मैदानावर खेळाडू दिसतात. येथे रुजलेल्या क्रीडा संस्कृतीचे हे प्रतीक आहे. अभ्यासाबरोबर खेळायलादेखील महत्त्व द्या, आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत खेळाडू घडावे, अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली. तसेच आठवीमध्ये जिल्हास्तरावर खेळताना जिल्ह्याबाहेर तिरुपतीमध्ये फुटबॉल खेळल्याच्या आठवणीही त्यांनी सांगितल्या.

क्रीडा पत्रकार जोसेफ विल्यम्स यांनी ही स्पर्धा शहरात फुटबॉल खेळायला ऊर्जा देणारी आहे. अशा स्पर्धेतूनच आंतरराष्ट्रीय कीर्तीचे खेळाडू घडत असतात. खेळातून शिस्त असलेला खेळाडू घडतो. खेळाडूंना खेळाचा व प्रशिक्षकांचा आदर, सन्मान करण्याचे व खेळाडूवृत्तीने पुढे जाण्याचे त्यांनी आवाहन केले.

यंदाच्या स्पर्धेत आठ संघांमधील खेळाडूंचे सामने दिवस-रात्र साखळी पद्धतीने सुरू आहेत. संघांमध्ये होणारी चुरस, खेळाडूंचे तंत्रकौशल्य, वेगवान खेळ आणि गोल करण्यासाठीची धडपड मैदानावर अनुभवायला मिळत आहे. या स्पर्धेमुळे स्थानिक फुटबॉलपटूंना व्यावसायिक पद्धतीने खेळण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

विशेष म्हणजे पुण्यातील नामांकित सिटी पुणे फुटबॉल क्लब आणि पुणे पायोनिअर्स फुटबॉल क्लबचे निवड समिती सदस्य या स्पर्धेसाठी उपस्थित आहेत. दोन दिवस खेळाडूंच्या कामगिरीचे निरीक्षण करून उत्कृष्ट खेळाडूंची निवड केली जाणार आहे. निवड झालेल्या गुणवंत खेळाडूंना संबंधित क्लबच्या संघात स्थान मिळविण्याची तसेच व्यावसायिक प्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे अहिल्यानगरमधील खेळाडूंना शहराबाहेरील मोठ्या फुटबॉल व्यासपीठावर आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची महत्त्वपूर्ण संधी मिळणार आहे.

यंदाच्या स्पर्धेत एमडी अँड आरडीएक्स इन्फ्रा, गुलमोहर चॅलेंजर्स, गांधी वॉरियर्स, डायनामिक स्ट्रायकर, एक्सलन्स अचिव्हर्स, विद्यादान अल्फा एक्स, डॉक्टर बायो आणि नवा मराठा योद्धा हे आठ संघ विजेतेपदासाठी मैदानावर उतरले आहेत. या सर्व संघांमध्ये मिळून शहरातील १०५ खेळाडूंचा समावेश आहे. संघमालक म्हणून ऋत्विक वाबळे, जोएब खान, चेतन गांधी, सिद्धार्थ मुनोत, आशिष टट्टू, रोहित रामदिन, सचिन सोलाट, ॲड. ललित गुंदेचा, अभिनंदन आणि रुही भन्साळी हे जबाबदारी सांभाळत आहेत.

वडगाव गुप्ता ग्रामपंचायतीकडून कृषिकन्यांचे उत्साहात स्वागत



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती मिळावी, शेतीतील नवनवीन प्रयोगांची ओळख व्हावी आणि कृषी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ग्रामीण जीवनाचा व शेतीचा अनुभव मिळावा, या उद्देशाने महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कृषी महाविद्यालय, विळद घाट येथील कृषिकन्यांचे वडगाव गुप्ता (ता. नगर) येथे आगमन झाले. यावेळी ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

ग्रामीण कृषी जागरूकता व कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत विद्यार्थी गावांमध्ये वास्तव्यास राहून शेतकऱ्यांशी थेट संवाद साधणार आहेत. या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतीपद्धती, शेतकऱ्यांच्या समस्या, उपलब्ध संसाधने तसेच कृषी क्षेत्रातील संधींचा अभ्यास करून कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार केला जाणार आहे.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे सेक्रेटरी जनरल प्रा. डॉ. पांडुरंग गायकवाड, संचालक (तांत्रिक) प्रा. सुनील कल्हापुरे, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. सोमेश्वर राऊत, उपप्राचार्य प्रा. डॉ. हरिभाऊ शिरसाठ, कार्यक्रम समन्वयक प्रा. किरण दांगडे, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. मिनीनाथ अनारसे व प्रा. डॉ. दीपिका मावळे तसेच विविध विषयांच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली कु. स्नेहल औटी, कु. तृप्ती भापकर, कु. समृद्धी भिंगारदिवे, कु. राजश्री भुतकर, कु. प्रियंका गणगे, कु. प्रचोदिता भोईटे आणि कु. सिद्धी पलघडमल या सात कृषिकन्या वडगाव गुप्ता येथे शेतकऱ्यांना कृषीविषयक मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत कृषिकन्या शेतकऱ्यांच्या शेतावर भेटी देऊन माती परीक्षण, फळबाग लागवड, सेंद्रिय शेती, बीजप्रक्रिया, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, आधुनिक कृषी अवजारांचा वापर, शेतीचे आर्थिक नियोजन, जनावरांचे लसीकरण तसेच शासनाच्या विविध कृषी योजनांविषयी माहिती देणार आहेत. याशिवाय शेतकऱ्यांच्या शेतीविषयक समस्या जाणून घेऊन त्यावर शास्त्रीय दृष्टिकोनातून उपाययोजना सुचविण्याचा प्रयत्न करणार आहेत. विविध कृषी विषयांवर प्रात्यक्षिके, शेतकरी-विद्यार्थी संवाद, जनजागृती कार्यक्रम आणि क्षेत्रीय उपक्रमांचे आयोजनही करण्यात येणार आहे.

कृषिकन्यांच्या स्वागतप्रसंगी मा. सरपंच सौ. सोनुबाई शेवाळे, मा. उपसरपंच श्री. विजय शेवाळे, ग्रामसेवक श्री. ज्ञानदेव अडसुरे, कृषी सहाय्यक सौ. नीता गोसावी, ग्रामपंचायत कर्मचारी श्री. अशोक शेवाळे व सौ. सीमा चांदने यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी या उपक्रमास सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

अनामप्रेम सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात दिव्यांग खेळाडूंसाठी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचा प्रारंभ

अंध विद्यार्थ्यांना गोलबॉलचे तर मूकबधिर विद्यार्थ्यांना तिरंदाजीचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अनामप्रेम सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे अनामप्रेम, आयशा () मुंबई व पॅरा ब्लाइंड स्पोर्ट्स असोसिएशन ,महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यामाने विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्यांना वाव देण्यासाठी दिनांक २३ व २४ नोव्हेंबर २०२६ असे दोन दिवसीय भव्य आंतरराष्ट्रीय क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात आंतरराष्ट्रीय पॅरा ऑलिम्पिक खेळ असलेल्या गोलबॉलचे प्रशिक्षण अंध विद्यार्थ्यांसाठी व आर्चरीचे (तिरंदाजी) प्रशिक्षण मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी तर देण्यात येत आहे. विशेष म्हणजे, या प्रशिक्षणासाठी मेक्सिको आणि मुंबई येथील आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू व अनुभवी प्रशिक्षक उपस्थित आहेत.

अंध विद्यार्थ्यांना गोलबॉल या खेळाचे प्रशिक्षण देण्यासाठी मेक्सिको येथील आंतरराष्ट्रीय गोलबॉल खेळाडू व प्रशिक्षक श्री गियेरमो सान्चेझ तसेच मुंबई येथील आंतरराष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक सौ. नेहा नलिन पावसकर मार्गदर्शन लाभत आहे. त्यांच्या जोडीला श्री. अलेक्सिस पेराल्टा आणि श्रीमती सायझा नायर या सहप्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन करत आहेत. मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी आर्चरीचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रसिध्द प्रशिक्षक श्री गणेश मिसाळ सर उपस्थित आहेत. सौ नेहा पावसकर यांना राष्ट्रपती, शिवछत्रपती, संविधान योद्धा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात लुईस ब्रेल, हेलन केलर आणि बाबा व सौ साधना आमटे यांच्या प्रतिमेचे पूजन करून तसेच राष्ट्रगीताने करण्यात आली. यावेळी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष इंजि. अजित माने यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तर संस्थेचे संचालक श्री अभय रायकवाड यांनी उपस्थित मान्यवरांचा परिचय करून दिला. त्यानंतर मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी रेसिडेन्शियल ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक कांजवणे एम. एस., प्राध्यापक डॉ. म्हातारदेव म्हस्के सर तसेच श्री. जवाहर मिठूलाल गुगळे सर यांची विशेष उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून संस्थेच्या कार्याचे भरभरून कौतुक केले. दिव्यांग विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुण ओळखून त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे ही अत्यंत कौतुकास्पद बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

या प्रशिक्षण शिबिरामुळे अंध विद्यार्थ्यांना गोलबॉलसारख्या आंतरराष्ट्रीय खेळाची ओळख व प्रत्यक्ष प्रशिक्षण मिळत असून मूकबधिर विद्यार्थ्यांना तिरंदाजी या कौशल्यपूर्ण खेळाचा अनुभव घेता येत आहे. मेक्सिको आणि मुंबई येथील अनुभवी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना प्रशिक्षण मिळणे ही त्यांच्यासाठी अत्यंत मोलाची संधी ठरली.

दिव्यांगत्व हे यशाच्या मार्गातील अडथळा नसून योग्य संधी, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाल्यास प्रत्येक विद्यार्थी आपले स्वप्न साकार करू शकतो, हा प्रेरणादायी संदेश या प्रशिक्षण शिबिरातून देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला बळ देणारा आणि त्यांच्या क्रीडा भवितव्याला नवी दिशा देणारा हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडत आहे.

हे प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी विष्णू वारकरी, रामदास काकडे, प्रवीण नवले, सुनील कांबळे, सुरेखा राठोड, सुरेखा कोतकर, राहुल खिरोडे, आनंद माळवे, अमृत भुसारी, प्रकाश गजे, अक्षय राऊत, सचिन गारदे, पोपट लोंढे, शिवानंद राऊत यांनी परिश्रम घेतले.

या प्रशिक्षणासाठी डॉ. गिरीश कुलकर्णी, डॉ. प्रकाश शेठ, डॉ. बापूसाहेब कांडेकर, डॉ. मेघना मराठे, श्री. अनिल गावडे, डॉ. रवींद्र सोमाणी, सीए अशोक पितळे, सौ. राधा कुलकर्णी, डॉ. सायली सोमण, श्री. नितीन थाडे, डॉ. धनंजय वाघ, श्री जे आर मंत्री, श्री. अविनाश बोपर्डीकर, ऍड. शाम असावा यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.


आयडीबीआय बँकेच्या खाजगीकरणाविरोधात अहिल्यानगरमध्ये गुरुवारी बँक कर्मचाऱ्यांचा एल्गार!

बँक कर्मचारी चळवळीची दिशा उलगडणार; विशेष मार्गदर्शन सभा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– सार्वजनिक बँकिंग क्षेत्रासमोर निर्माण झालेली आव्हाने, आयडीबीआय बँकेच्या प्रस्तावित खाजगीकरणाचे संभाव्य परिणाम आणि त्याचा बँक कर्मचारी चळवळीवर होणारा प्रभाव या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यासाठी अहिल्यानगरमध्ये गुरुवारी (दि. २६ नोव्हेंबर) विशेष मार्गदर्शन व संवाद सभेचे आयोजन करण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्हा बँक कर्मचारी संघटनेच्या वतीने दिल्लीगेट येथील स्पाय हॉटेलमध्ये सायंकाळी ५ वाजता ही सभा होणार आहे.

देशातील सार्वजनिक बँकिंग व्यवस्थेचे भवितव्य, बँकिंग क्षेत्रातील बदलती धोरणे, खासगीकरणाचे संभाव्य परिणाम आणि बँक कर्मचाऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण या विषयांना सध्या विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर बँकिंग उद्योगातील सद्यस्थितीचा आढावा घेऊन कर्मचारी चळवळीपुढील



आव्हाने आणि आगामी संघर्षाची दिशा यावर या सभेत सविस्तर विचारमंथन केले जाणार आहे.

या सभेच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य बँक कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष कॉ. धनंजय कुलकर्णी राहणार आहेत. बेट्टाचे अध्यक्ष तसेच आयडीबीआय कर्मचारी संघटनांच्या संयुक्त मंचाचे (युनायटेड फोरम ऑफ आयडीबीआय युनियन्स) निमंत्रक कॉ. देविदास तुळजापूरकर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहून आयडीबीआय बँकेचे खाजगीकरण आणि बँक कर्मचारी चळवळीपुढील आव्हाने या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

यावेळी महाराष्ट्र राज्य बँक कर्मचारी महासंघाचे सहसचिव कॉ. शिरीष राणे आणि विभागीय सचिव कॉ. नरेंद्र जंगम यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. बँकिंग क्षेत्रातील संघटनात्मक भूमिका, कर्मचारी हिताचे प्रश्न, सार्वजनिक बँकांचे महत्त्व आणि बदलत्या आर्थिक धोरणांच्या पार्श्वभूमीवर कर्मचारी संघटनांसमोरील आव्हाने याबाबत या सभेत विचार मांडले जाणार आहेत.

मुख्य मार्गदर्शन सभेपूर्वी दुपारी ४ ते ५ या वेळेत बँकांमधील हंगामी कर्मचारी आणि व्यवसाय प्रतिनिधी (बँक मित्र) यांच्यासाठी स्वतंत्र विशेष सत्र आयोजित करण्यात आले आहे. या सत्रात हंगामी कर्मचाऱ्यांच्या समस्या, त्यांचे हक्क, कामाच्या ठिकाणी येणाऱ्या अडचणी तसेच व्यवसाय प्रतिनिधींचे प्रश्न आणि भविष्यातील वाटचाल यावर मार्गदर्शन केले जाणार आहे. या विशेष सत्राचा लाभ घेण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेने केले आहे.

कल्याण रोडवरील शिंदे मळा येथे 'गौरी गणपती आर्ट' कारखान्याचे उद्घाटन

गणपती कारखान्यांच्या माध्यमातून तरुणांना वर्षभर रोजगाराची संधी – ॲड. युवराज शिंदे । गणपती मूर्ती निर्मितीत अहिल्यानगर शहर राज्यात अव्वल



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– शहरातील कल्याण रोड परिसरातील शिंदे मळा येथे महालक्ष्मी उद्योग समूहाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या 'गौरी गणपती आर्ट' कारखान्याचे उद्घाटन राजेंद्र शिंदे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी ॲड. युवराज शिंदे म्हणाले की, अहिल्यानगर शहरातील कल्याण रोड परिसरात मोठ्या प्रमाणात गणपती मूर्ती तयार करण्याचे कारखाने आहेत. या कारखान्यांच्या माध्यमातून अनेक युवकांना वर्षभर रोजगार उपलब्ध होत आहे. गणपती मूर्ती निर्मितीच्या क्षेत्रात अहिल्यानगर शहर राज्यात अव्वल स्थानावर असून, गणेशोत्सवाच्या काळात राज्यातील विविध जिल्ह्यांतून येथे मोठ्या प्रमाणात गणपती मूर्तींची खरेदी केली जाते.

विविध रूपांतील आणि आकर्षक स्वरूपातील गणपती मूर्ती तयार करण्याचे कौशल्य येथील कलाकारांकडे आहे. युवकांच्या कलागुणांना आणि त्यांच्या कलेला योग्य व्यासपीठ मिळावे, तसेच त्यांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने महालक्ष्मी उद्योग समूहाच्या माध्यमातून गौरी गणपती आर्ट कारखाना सुरू करण्यात आला आहे. अशा उपक्रमांमुळे स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन मिळण्याबरोबरच रोजगारनिर्मितीलाही चालना मिळेल, असे त्यांनी सांगितले.

या उद्घाटनप्रसंगी शिवाजी शिंदे, ॲड. युवराज शिंदे, देवा होले, शरद शिंदे, हरीश शिंदे, अनिकेत शिंदे, परितोष शिंदे, विराज शिंदे, राजवीर शिंदे, यशराज शिंदे, तुषार कपाले, किरण सुपेकर, ॲड. श्रीकांत डुबे पाटील, शंतनू डुबे पाटील, शेलके सर, सतीश लगड, विजय विश्वकर्मा, विवेक खौसे सर, अरुण ढाकणे, सूरज नवले, राजेंद्र पाडळे, रोहन पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. सुजय विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त स्मित डेंटल क्लिनिकतर्फे मोफत दंत तपासणी शिबिराचे आयोजन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष, भाजपा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा मा. खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त स्मित डेंटल क्लिनिक, प्रोफेसर चौक, सावेडी, अहिल्यानगर यांच्या वतीने डॉ. सुमित नलावडे यांच्या पुढाकाराने भव्य मोफत दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक २३, २४ व २५ नोव्हेंबर २०२६ रोजी स्मित डेंटल क्लिनिक येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



या शिबिरांतर्गत ज्येष्ठ नागरिकांची मोफत दंत तपासणी, लहान मुलांच्या दातांची मोफत तपासणी तसेच वेडेवाकडे दात सरळ करण्यासाठी ऑर्थोडॉन्टिक उपचार (दातांना क्लिप्स लावणे) याबाबत मोफत तपासणी व मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या शिबिराचे उद्घाटन महापौर सौ. ज्योती अमोल गाडे व उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी नगरसेवक महेश लोंढे, संपत नलावडे, युवराज चव्हाण, अथर्व वासकर, पार्थ सोमाणी, प्रज्वल जेजुरकर यांच्यासह स्मित डेंटल क्लिनिकमधील सर्व डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी व इतर मान्यवर उपस्थित होते.नागरिकांमध्ये दंत आरोग्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी तसेच समाजातील सर्व घटकांना दंत आरोग्य तपासणी व योग्य उपचारांबाबत मार्गदर्शन मिळावे, या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व नगरकरांनी या मोफत दंत तपासणी शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. सुमित नलावडे यांनी केले आहे

(पान १ वरून)

माजी नगरसेवक बाळासाहेब पवारांसह तिघांच्या घरात चोरी करणारा आरोपी निघाला हिंगोलीचा

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य, सपोनि कल्पना चव्हाण आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई केली.

नगर तालुक्यातील अवैध धंदे त्वरित बंद करा

पोलीस ठाण्याचे संबंधित अधिकारी व कर्मचारी जबाबदार असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. प्रशासनाने या अवैध धंद्यांवर त्वरित आळा घालून दोषींवर कारवाई करावी, अन्यथा स्थानिक नागरिकांना सोबत घेऊन पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन व उपोषण छेडण्यात येईल, असा इशारा शरद पवार यांनी दिला आहे. निवेदनाच्या प्रती राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री, ग्रामीण पोलीस उपअधीक्षक आणि नगर तालुका पोलीस निरीक्षक यांनाही पाठवण्यात आल्या आहेत.

बेलापूर येथील जुगार अड्ड्यावर एलसीबीचा छापा; १० जणांवर गुन्हा

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी विशेष पथक तयार करून त्यांना कारवाईसाठी रवाना केले होते. दिनांक २३ नोव्हेंबर रोजी हे पथक श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना, बेलापूर गावातील बसस्थानकाच्या पाठीमागे एका पत्र्याच्या टपरीमध्ये काही इसम सोरट पानावरील चित्रावर पैसे लावून जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

पथकाने तातडीने घटनास्थळी छापा टाकून चांगदेव परसराम देखणे (वय ४२, रा. उंबरगाव), सुरज विलास कुमावत (वय ३२), विनायक ज्ञानेश्वर मोरे (वय २२), सतीष अनिल गायकवाड (वय २७, रा. वडारवाडा), विकास विठ्ठल गायकवाड (वय २५, रा. उंबरगाव), गणेश सोपान टाक (वय ४०, रा. टाकगल्ली), संकेत श्रीराम कुमावत (वय २८), सचिन श्याम खाजेकर (वय ३५), सुनिल विजय खरात (वय २३, रा. खटकळी, पढेगाव रोड, श्रीरामपूर) आणि संतोष बबन गाडे (वय ३६, रा. कुऱ्हेवस्ती, सर्व रा. बेलापूर, ता. श्रीरामपूर) या दहा जणांना ताब्यात घेतले.

या प्रकरणी सर्व आरोपींविरोधात श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे व पोलीस अंमलदार रिचर्ड गायकवाड, राहुल डोके, भगवान थोरात, सुनिल मालणकर, रमीजराजा आत्तार आणि जालींदर साखरे यांच्या पथकाने केली.

दुष्काळावर मात करीत समृद्ध गावांच्या निर्मितीसाठी अहिल्यानगरमध्ये सरपंचांचा महासंवाद!

सरपंच परिसंवादाच्या माध्यमातून नाशिक विभागातील ग्रामपंचायतींच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आनंद भंडारी यांनी व्यक्त केला आहे. या कार्यक्रमास नाशिक विभागातील सर्व सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी आणि संबंधितांनी उपस्थित राहावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

जम्मू-काश्मीरमधील वैष्णोदेवीच्या सान्निध्यात बुरूडगावच्या नवरदेवाचा विवाह सोहळा!

विधी पार पडले. या माध्यमातून धार्मिक परंपरा, संस्कृती आणि पारंपरिक संगीताचा वारसा जपण्यासोबतच डीजेमुक्तीचा संदेशही देण्यात आला. या विवाह सोहळ्यासाठी जम्मू-काश्मीर येथील मिटू भैय्या शर्मा यांनी मोलाचे सहकार्य केले. या आयोजनामुळे अहिल्यानगर आणि जम्मू-काश्मीर येथील नागरिकांमध्ये स्नेहाचे आणि कौटुंबिक संबंध निर्माण झाले. वैष्णोदेवी मातेच्या सान्निध्यात पार पडलेला हा विवाह सोहळा वऱ्हाडी मंडळींसाठी अविस्मरणीय ठरला, अशी माहिती नवनाथ वाघ यांनी दिली.